

# जनसंवाद सभेत 56 तक्रार वजा सूचना प्राप्त

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in बुधवार दिनांक 25/06/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 140 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# राज्यात उभारणार 1071 मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प - मुख्यमंत्री

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई, पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करून कार्बन उत्सर्जन घटवून शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा अखंडित वीज पुरवठा देऊन शेतीची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी शासन विविध योजना राबवित आहे. राज्यात शाश्वत विकासास चालना देण्यासाठी महानिर्मितीतर्फे १,०७१ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प ‘मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प २.०’ अंतर्गत लवकरच कार्यान्वित होणार आहेत. या प्रकल्पांमुळे राज्यातील तीन लाख शेतकऱ्यांना लाभ होणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.




महानिर्मिती ही म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी मर्यादित या कंपनीची संपूर्ण मालकीची उपकंपनी असून, सुमारे १३,८८० मेगावॅट क्षमतेसह भारतातील सर्वात मोठ्या राज्य-नियंत्रित विद्युत उत्पादकांपैकी एक आहे. नॅशनल थर्मल पॉवर कंपनी नंतर (NTPC) ही देशातील दुसऱ्या क्रमांकाची राज्य मालकीची जनरेशन कंपनी आहे. औष्णिक, वायू, जल विद्युत आणि सौर असे ऊर्जा उत्पादन क्षेत्रात वैविध्य असलेली महानिर्मिती ही कंपनी नवीकरणीय ऊर्जेचे प्रकल्प सुरू करत आहे, ज्यामुळे वीज ग्राहकांना कमी दरात वीजपुरवठा करत कार्बन उत्सर्जनात घट होण्यास मदत होणार आहे.

जीईएपीपी इंडिया (ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅनेट

द रॉकफेलर फाउंडेशन (The Rockefeller Foundation), इकीया फाउंडेशन (IKEA Foundation) आणि बेझॉस अर्थ फंड (Bezos Earth Fund) यांच्या सहकार्याने स्थापन झालेली जीईएपीपी इंडिया (ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅनेट) ही संस्था विकसनशील देशांमध्ये न्याय्य, समतोल व वेगवान हरित ऊर्जेसाठी मदत करते. जीईएपीपी इंडिया ही जीईएपीपी एलएलसीची भारतीय शाखा असून, भारतात विशेषतः वितरणक्षम ऊर्जेसाठी उपयुक्त उपक्रमांची अंमलबजावणी करत आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०

पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करून कार्बन उत्सर्जन घटवून शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा अखंडित वीज पुरवठा देऊन शेतीची उत्पादनक्षमता वाढविणे हे राज्य शासनाचे ध्येय आहे. कृषी ग्राहकांच्या सेवाखर्चात कपात करून शाश्वत ऊर्जेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाची अत्यंत महत्त्वाकांक्षी असलेली मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० आहे. यातून वितरित पद्धतीने नवीकरणीय ऊर्जा वापरून कृषी वापरासाठी सौर प्रकल्प जोडण्यात येतात. सन २०२५ पर्यंत सुमारे ३०% फीडरचे सोलरायझेशनचे उद्दिष्ट ‘मिशन २०२५’ म्हणून निश्चित केले आहे, ज्यामध्ये शेतक-यांना दिवसा वीज देण्यासाठी ०.५ मेगावॅट ते २५ मेगावॅट क्षमतेचा कृषी भार असलेल्या वितरण उपकेंद्रापासून ५ – १० किमी परिघात विकेंद्रित सौर प्रकल्प उभारले जातात.

महानिर्मितीला सौर ऊर्जा योजनेसाठी जीईपीपीची मदत

जीईपीपी इंडिया हा प्रकल्प प्रभावीपणे राबवण्यासाठी प्रकल्प मॉनिटरिंग युनिट (PMU) सुविधा आणि एक डिजिटल प्लॅटफॉर्म उपलब्ध करत आहे, माहितीचे संकलन, या प्रकल्पाची सद्यस्थिती आणि प्रकल्पांचे सुलभ व्यवस्थापन शक्य होईल. जीईपीपीच्या तंत्रज्ञान आणि नवकल्पनांचा उपयोग करून मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प २.० ची प्रभावी अंमलबजावणी करणे. महाराष्ट्रात शाश्वत विकासास चालना देणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे.

हे सौर ऊर्जा प्रकल्प वेळेत पूर्ण करणे करता धोरणात्मक संयुक्त समिती स्थापन करण्यात येणार असून ही समिती मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेबाबत मार्गदर्शन करेल. या समितीमध्ये सर्व सहभागधारक यांचा समावेश असणार आहे.

जीईएपीपी इंडिया (ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅंने व महानिर्मितीतर्फे सेंट्रल डॅश बोर्ड तयार करण्यात येणार असून यामार्फत जमीन संपादन ते प्रकल्प उभारणी प्रगती यांचे दैनंदिन तत्वावर अवलोकन करण्यात येणार आहे.

सर्व भागधारकांसाठी या डॅश बोर्ड वापराबाबतचे प्रशिक्षण देण्यात येऊन हे सौर प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. या प्रकल्पाच्या माध्यमातून रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होणार आहेत.

# मनपा क्षेत्रात तुर्की आणि चीनच्या उत्पादनांवर बंदी घालण्याची भाजपची मागणी

## शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांचे आयुक्तांना पत्र

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी- चिंचवड, पुलवामा हल्ल्यानंतर पाकिस्तानशी सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, पाकिस्तानला अप्रत्यक्ष किंवा प्रत्यक्ष मदत करणाऱ्या तुर्की, अझरबैजान आणि चीन या देशांच्या उत्पादनांवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात बंदी घालण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. भारतीय जनता पक्षाचे (भाजप) शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांना यासंदर्भात एक लेखी पत्र दिले आहे. महापालिकेच्या विविध विकासकामांमध्ये आणि इतर सरकारी कामांमध्ये या देशांच्या उत्पादनांचा वापर तातडीने थांबवण्यात यावा, अशी मागणी काटे यांनी पत्राद्वारे केली आहे.



शत्रुघ्न काटे यांनी आयुक्तांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, "पुलवामा हल्ल्यानंतर पाकिस्तानबरोबर झालेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर देशातील जनतेच्या भावना अत्यंत तीव्र आहेत. पाकिस्तानला पाठिंबा देणाऱ्या तुर्की, अझरबैजान आणि चीन या देशांच्या उत्पादनांवर बंदी घालण्याचे सरकार आणि विविध समाजातील घटकांकडून प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष निर्देश आहेत.

या तीव्र भावना लक्षात घेता, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व सरकारी कामांमध्ये, विशेषतः महापालिका क्षेत्रातील विविध विकास प्रकल्पांमध्ये आणि इतर कामांमध्ये तुर्की, अझरबैजान आणि चीनमधील कंपन्यांची उत्पादने वापरली जाऊ नयेत, अशी मागणी त्यांनी केली आहे. या मागणीची दखल न घेतल्यास गंभीर परिणामांचा इशाराही काटे दिला आहे.

"या देशांतील कंपन्यांच्या उत्पादनांचा वापर महापालिकेकडून केला जात असल्यास त्याची गंभीर दखल घेण्यात येईल आणि त्याविषयी आंदोलन व अन्य मार्गाने अशी कामे न होण्याबाबत आम्ही योग्य ती भूमिका घेऊ," असे काटे यांनी पत्रात म्हटले आहे.

त्याचबरोबर, आयुक्तांनी महापालिकेच्या सर्व विभागांना या संदर्भात तातडीने सूचना द्याव्यात आणि विकास प्रकल्पांमध्ये व अन्य कामांमध्ये या देशांतील उत्पादने वापरली जाणार नाहीत याची खबरदारी घेतली जाईल, याची खात्री करावी, अशी विनंतीही काटे यांनी केली आहे.

# पनवेल विमानतळ सप्टेंबरपासून सुरु

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



मावळ लोकसभा मतदारसंघातील पनवेल येथील लोकनेते दि.बा.पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाला वेग आला आहे. इंटर टर्मिनल कनेक्टिव्हिटी असणारा भारतातील हे पहिलेच विमानतळ असणार आहे. वार्षिक दोन कोटी प्रवासी क्षमता असलेले टर्मिनल एक सप्टेंबर 2025 पासून सुरु होईल. येथून आंतरराज्यीय विमानसेवा प्राथमिक स्थरावर सुरु होणार असल्याची माहिती शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली.

मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी मंगळवारी प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला भेट दिली. कामाचा संपूर्ण आढावा घेतला. अधिकाऱ्यांना कामाला गती देण्याच्या सूचना दिल्या. अदानी एरपोर्ट विभागाच्या सीईओ मिनल नाईक, सिडको प्रोजेक्ट मॅनेजर गीता पिल्ले यांनी विमानतळाच्या कामाचे सादरीकरण दिले. यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे, जिल्हा प्रमुख अतुल भगत, शिवसेना उपजिल्हा प्रमुख विनोद साबळे, शिवसेना पनवेल महानगर प्रमुख प्रथमेश सोमण, पनवेल शिवसेना तालुका प्रमुख रघुनाथ पाटील, उरण तालुका प्रमुख दिपक ठाकूर, शिवसेना शहर प्रमुख प्रसाद परब, तुकाराम सरख, सुनिल गोवारी, प्रसाद सोनवणे, शिवसेना उपमहानगर प्रमुख महेश सावंत, शिवसेना संपर्क प्रमुख मंगेश राणवडे, शिवसेना महिला उरण विधानसभा जिल्हा संघटिका मेधाताई दमडे व पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. खासदार बारणे म्हणाले, पुणे आणि मुंबईला जोडणाऱ्या पनवेलमध्ये हे आंतरराष्ट्रीय विमानतळ होत आहे. मेट्रो 1, मेट्रो 2, मेट्रो 3 यासह वॉटर टॅक्सी, स्थानिक लोकल ट्रेन सेवा आणि भविष्यातील मुंबई हैदराबाद बुलेट ट्रेन यांची थेट कनेक्टिव्हिटी आणि मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळापासून नवी मुंबई विमानतळापर्यंत देखील थेट कनेक्टिव्हिटी असणार आहे. प्रदूषण रहित 'ग्रीन एअरपोर्ट' कन्सेप्ट राबविली जाणार आहे.1150 हेक्टर इतक्या मोठ्या परिसरात एअरपोर्टचा विस्तार होत आहे. विमानात इंधन भरण्याची अंडरग्राउंड पाईपलाईन तर्फे (ASF) प्रणाली कार्यान्वित केली जाणार आहे. सप्टेंबर 2025 पासून टर्मिनल वन सुरू होणार आहे. त्याची वार्षिक दोन कोटी प्रवासी क्षमता असणार आहे. 2029 पर्यंत टर्मिनल टू सह जवळजवळ 80 टक्के कामकाज पूर्ण होईल असे अपेक्षित आहे. सन 2036 पर्यंत चार टर्मिनल्स, एक व्हीआयपी टर्मिनल, जनरल एव्हिएशन (खाजगी विमाने) देशातील सर्वात मोठे कार्गो डेपो असे संपूर्ण विमानतळ शंभर टक्के विकसित होणार आहे. 3.7 किलोमीटरचा सर्वाधिक लांबीचा रनवे असणार आहे. त्यावर मोठी कार्गो विमाने व एअरबस ए 380 सारख्या विमानांचे लँडिंग आणि उड्डाण शक्य होणार आहे. मुंबईच्या सध्याच्या आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या जवळ जवळ दुप्पट प्रवासी व विमानांच्या दळणवळणाची क्षमता आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
बुधवार दिनांक 25/06/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# पिंपरी चिंचवड शहर डास उत्पत्तीसाठी पोषक ?

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी :- पिंपरी चिंचवड महापालिका आरोग्य विभागाची आज डेंग्यू, मलेरिया आणि इतर डासजन्य आजारांच्या प्रतिबंधासाठी विशेष बैठक पार पडली. या बैठकीत डेंग्यू मलेरियाच्या अनुषंगाने घरांची तपासणी करणे, कंटेनर तपासणी करणे, भंगार दुकानाची तपासणी, औषध फवारणी, तसेच डेंग्यू आणि मलेरियाबाबत उपाययोजना आणि दंडात्मक कारवाईची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

डेंग्यू आणि मलेरियाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिका सध्या डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी विशेष मोहीम देखील राबवत आहे. या मोहिमे अंतर्गत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासोबतच सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जात आहे.

घरांची तपासणी : एकूण १ लाख ८४ हजार १०६ घरांची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी ३ हजार ७९ घरांच्या परिसरात डास उत्पत्तीसाठी पोषक वातावरण असल्याचे आढळून आले. कंटेनर तपासणीत ९ लाख ५६ हजार ४१८ कंटेनरपैकी ३ हजार ४०१ कंटेनरमध्ये डास उत्पत्तीसाठी पोषक वातावरण असल्याचे आढळून आले. ४४२ भंगार दुकानांची तपासणी करण्यात आली. बांधकाम स्थळे ६९७ बांधकाम स्थळांची तपासणी करून त्यामध्ये अस्वच्छता व पाणी साचल्याचे निदर्शनास आले. नोटीस व दंड एकूण १ हजार २९२ ठिकाणी नोटीस बजावण्यात आल्या असून १२२ नागरिक व आस्थापनांवर थेट दंडात्मक कारवाई करत ३ लाख ३६ हजार इतकी दंडची रक्कम वसूल करण्यात आली.

डेंग्यू आणि मलेरियाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आरोग्य विभाग विविध उपाययोजना करीत आहे. नागरिकांनी देखील आपले घर व परिसरात डासांची उत्पत्ती होण्यास प्रतिबंध घालावा. वारंवार सूचना देऊनही अंमलबजावणी होत नसेल तर होणाऱ्या दंडात्मक कारवाईस सामोरे जावे लागेल.

# जनसंवाद सभेत 56 तक्रार वजा सूचना प्राप्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



महापालिकेच्या वतीने पार पडलेल्या जनसंवाद सभेत एकूण ५६ तक्रार वजा सूचना प्राप्त झाल्या आहे.

नागरिक आणि प्रशासन यांच्यात सुसंवाद राखण्यासाठी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या आदेशानुसार सर्व क्षेत्रीय कार्यालयांत महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येते. त्यानुषंगाने अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या आठ क्षेत्रीय कार्यालयात आज जनसंवाद सभा पार पडली. यावेळी जनसंवाद सभेचे अध्यक्षपद नेमून दिलेल्या समन्वय अधिकारी यांनी भूषविले. पार पडलेल्या जनसंवाद सभेत अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या क्षेत्रीय कार्यालयात अनुक्रमे ५, ७, ६, ६, २, १०, ४ आणि १६ अशा एकूण तक्रारी वजा सूचना नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या.

यावेळी नागरिकांनी पावसामुळे तुंबलेल्या नाल्यांची साफसफाई करणे, विविध उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करणे, ठिकाणी रस्त्यांवर पडलेले खड्डे बुजविणे, डासांचा प्रादुर्भाव वाढू नये याची काळजी घेणे, आवश्यक ठिकाणी किटकनाशक फवारणी करणे, मोकाट श्वानांचा बंदोबस्त करणे, रस्त्यांवरील अनधिकृत अतिक्रमणांवर कारवाई करणे, तुटलेल्या चेंबर्सच्या झाकणांची दुरूस्ती करणे आदी तक्रार वजा सूचना जनसंवाद सभेत नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
बुधवार दिनांक 25/06/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# हिंजवडीचा पिंपरी चिंचवड महापालिकेत समावेश करा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

(हिंजवडी आयटी पार्कमधील कर्मचारी व रहिवाशांनी आता एकत्र येत आपल्या हक्कांसाठी आवाज उठवला आहे. हिंजवडी परिसरातील गावांचा पिंपरी-चिंचवड महापालिकेत समावेश करावा, यासाठी वेबसाइटवर ऑनलाईन याचिका सुरू करण्यात आली आहे. त्यास आयटी कर्मचाऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे.




नागरी सेवा सुधाराव्यात आणि नागरिकांचे जीवनमान उंचावावे, याकरिता राज्य सरकारने तत्काळ निर्णय घेऊन हिंजवडी परिसरातील गावे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करावीत अशी प्रमुख मागणी आहे. सुमारे सात हजार स्वाक्षऱ्या पूर्ण झाल्यानंतर ही याचिका थेट महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांच्याकडे सादर करण्यात येणार आहे, अशी माहिती या उपक्रमात पुढाकार घेणारे सचिन लोंढे यांनी दिली. त्याचबरोबर, पुढील टप्प्यात नागरिकांच्या स्वाक्षऱ्यांसह कोर्टात ऑफलाईन याचिका दाखल करून कायदेशीर लढा उभारण्याचाही मानस व्यक्त करण्यात आला आहे.

या अभियानामागे हिंजवडी आयटी पार्कमधील अनेक नागरिक, आयटी क्षेत्रातील कर्मचारी आणि विविध संस्थांचे प्रतिनिधी एकवटले असून, सर्वसामान्यांच्या जीवनशैलीत सकारात्मक बदल घडवून आणण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

स्वाक्षरी करण्यासाठी www.change.org/UNCLOG Hinjawadi IT Park ही लिंक उपलब्ध करून देण्यात आली असून अधिक माहितीसाठी द हँडल: @pcmchsgsociety याच्याशी संपर्क साधावा. आपली एक स्वाक्षरी मोठा बदल घडवू शकते, असा विश्वास या अभियानाच्या आयोजकांनी व्यक्त केला आहे.

# खडकी ‘मेट्रो स्टेशन’ प्रवासी सेवेत दाखल

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी स्वारगेट ते पिंपरी-चिंचवड मेट्रो मार्गिकेअंतर्गत असलेले खडकी मेट्रो स्थानक शनिवारपासून (दि. २१) प्रवासी सेवेत दाखल झाल आहे. हे स्थानक खडकी रेल्वे स्थानकाच्या अगदी जवळ असल्यामुळे आणि या मेट्रो स्थानकातून प्रवाशांना थेट खडकी रेल्वे स्थानकात जाण्यासाठी मार्ग असल्यामुळे मेट्रो आणि रेल्वे या दोन्ही वाहतूक सेवांचे या ठिकाणी एकत्रीकरण शक्य झाले आहे.




हे स्थानक सुरू झाल्याने या परिसरातील नागरिकांना तसेच रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना पुणे मेट्रोच्या सेवेचा लाभ घेणे सुलभ होईल, असा दावा महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कार्पोरेशनकडून करण्यात आला आहे.खडकी स्थानक सुरू झाल्यामुळे प्रवाशांना खडकी, विद्यापीठ, औंध आयटी पार्क, खडकी कॅन्टोन्मेंट, खडकी बाजार, रेंज हिल, औंध रस्ता, ऑर्डनन्स फॅक्टरी हॉस्पिटल, मुळा रस्ता अशा अनेक ठिकाणी पोहोचणे सोयीस्कर होणार आहे.

‘मेट्रोच्या विस्तारात खडकी स्थानकाची भर पडल्याने पुणे आणि पिंपरी चिंचवड या जुळ्या शहरांना जोडणाऱ्या या रस्त्यावरील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक बळकट झाली आहे. प्रवाशांना सार्वजनिक वाहतुकीचा वापर करताना अधिक सोयीस्कर आणि अखंड प्रवासाचा अनुभव घेता येईल,’ असे महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी सांगितले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968